ही जागा
जाहिरातीसाठी
मासिक, सहामाही
किंवा वार्षिक
कराराने देणे आहे.
संपर्क : ९८५०४४७६८५

आमचं लिहिणं, आमची भाषा ! आमचं जगणं, आमची "आशा" !
आंशूराज प्रकाशनचे लोकप्रिय वृत्तपत्र
दैनिक युवा मराठा
बहुजन समाजाच्या चळवळीसाठी समर्पित

ही जागा
जाहिरातीसाठी
मासिक, सहामाही
किंवा वार्षिक
कराराने देणे आहे.
संपर्क : ९८५०४४७६८५

मुख्य संपादक - राजेंद्र पाटील राऊत | व्यवस्थापकीय संपादक- श्रीमती आशाताई बच्छाव | उप संपादक -प्रशांत एस बच्छाव | सह संपादक - स्वप्नील देशमुख | कार्यकारी संपादक - श्री. विजय पवार

वर्ष २१ वे अंक ११९ पाने २ रविवार, दि. १४ एप्रिल २०२४ Reg. No. MAH-MAR-4172/2003 किंमत ५ ₹

# पावणे दोन वर्षांत घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये सामान्य जनतेच्या हिताचे लोकाभिमुख निर्णय- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## सगेसोयरे व्याख्यासंदर्भातील अधिसूचनेवरील ४ लाख हरकतींची नोंद व छाननी पुर्ण

मुंबई, (श्री प्रविण पुष्पाबाई वामनराव क्षिरसागर प्रतिनिधी युवा मराठा न्युज ) : राज्य शासनाने गेल्या पावणे दोन वर्षांत आतापर्यंत घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये शेतकरी, कामगार, महिला, युवा, ज्येष्ठ नागरिक असे सामान्य जनतेच्या हिताचे लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. आज घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील जनहिताचे निर्णय घेतले असून त्यामध्ये कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भावांतर पद्धतीने लाभ देण्यासाठी ४ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सगेसोयरे व्याख्यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेवर हरकती व सूचनांची छाननीची कार्यवाही सुरू असून ४ लाख हरकतींची नोंद व छाननी पुर्ण झाली आहे. येत्या चार महिन्यात यासंदर्भात कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत सांगितले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर सह्याद्री अतिथीगृह येथे



झालेल्या पत्रकार परिषदेस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री सर्वश्री धनंजय मुंडे, दीपक केसरकर, संजय बनसोडे यावेळी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आमच्या सरकारने पहिल्या दिवसापासून ते आजपर्यंत सामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय आतापर्यंत पावणे दोन वर्षांत सुमारे ५० ते ६० मंत्रिमंडळाच्या बैठका झाल्या आहेत. मराठा समाजाला टिकणारं आरक्षण देण्याची भुमिका शासनाची पहिल्यापासून आहे. त्यासाठी विशेष अधिवेशन घेऊन मराठा समाजाला १० टक्के आरक्षणाच निर्णय घेतला. त्याची अमंलबजावणी देखील सुरू असून शासकीय पदभरतीमध्ये त्याचा मराठा समाजातील तरुणांना लाभ होत आहे. राज्यात सगेसोयरे व्याख्यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेवर हरकती व सूचनांची छाननीची कार्यवाही सुरू असून आजपर्यंत ४ लाख हरकतींची नोंद व छाननी पुर्ण झाली आहे. या अधिसुचनेवर एकूण ८ लाख ४७ हजार एवढ्या हरकती आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत. आहे. उर्वरीत ४ लाख ४७ हजार हरकतींची नोंदणी व छाननी करण्याची कार्यवाही सुरू असून त्याकरीता साधारणतः २५ ते ३० दिवसांचा कालावधी लागणार आहे. सामाजिक न्याय विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिव्यांग कल्याण विभाग या विभागांकडून या हरकतींची नोंदणी व छाननी या हरकतींची सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कार्यालयात उपस्थित राहुन केली जात आहे. आता हे कर्मचारी देखील निवडणुक प्रक्रियेमध्ये व्यस्त असतील त्यामुळे त्यांना अवधी लागेल. त्यानंतर अधिसूचनेची मसुदा अंतिम करून विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करू असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# संग्रामपर भाजपा वैद्यकीय आघाडी संग्रामपूर तालुकाध्यक्षपदी डॉ.अमोल धुर्डे

( ब्युरो चीफ बुलढाणा)
संग्रामपूर : भारतीय जनता पार्टीच्या वैद्यकीय आघाडी संग्रामपूर तालुका अध्यक्षपदी वरवट बकाल येथील आई चिल्ड्रन्स हॉस्पिटलचे संचालक, सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.अमोल संपतराव धुर्डे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारसंघाचे भाजपा आमदार डॉ.संजय कुटे यांच्याहस्ते नुकतेच याबाबतचे नियुक्ती पत्र डॉ.धुर्डे यांना



दिले आहे. डॉ.अमोल धुर्डे मूळचे जामोद गावचे असून ते अनेक वर्षापासून राजकारणात सक्रीय आहेत. त्यांच्याकडे जळगांव जामोद भाजप तालुका कोषाध्यक्ष पदाचीही जबाबदारी आहे. वैद्यकीय सेवा करतांना संग्रामपूर तालुक्यातही त्यांचा दांडगा जनसंपर्क असल्याने त्यांच्यावर वैद्यकीय आघाडीच्या तालुका अध्यक्षपदाची आणखी एक महत्त्वपूर्ण जबाबदारी देण्यात आल्याचे बोललं जात असुन त्यांच्या या नियुक्तीने सर्व स्तरावरून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.









सम्पादकीय

दैनिक युवा मराठा

# "सुख दु:खाचे साथीदार (आयुष्यातील घडामोडीचा रोखठोक आढावा)!

**वाचकहो,**

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याला नाव नसते फक्त आणि फक्त श्वास असतो.आणि मरतो तेव्हा त्याला नाव असते पण श्वास नसतो, या जीवनाच्या प्रवासातील अत्यंत महत्वाचा जो काळ म्हणून माणूस जगतो त्यालाच जीवन असे म्हणतात! आणि नेमके याच काळात माणूस नेमके जगला कशासाठी? अन् कुणासाठी? यामुळेच तर त्याचे नाव मेल्यानंतर सुध्दा लक्षात राहते.कुणी नाव कमावण्यासाठी जीवाची आगपाखड करून पराकाष्ठा पणाला लावतो.तर कुणी नाव बदनाम करण्यासाठी क्षणार्धात कमावलेली सगळी मातीमोल ठरवितो.हा झाला ज्याचा त्याचा वैयक्तिक जगण्याचा अधिकार व अधिभार...पण आपण माणूस म्हणून कुणासाठी काय जगलोत हा अनमोल संदेश किती जणांच्या अंगवळणी पडेल हे निश्चितच रुचणारे ठरणार नाही आणि आमच्या अग्रलेखाचे शिर्षक वाचून देखील बहुतांश जणांना हेच वाटेल की,सुख दुःखाचे साथीदार कोण तर...बस आपली बायको,मुले नातेवाईक आप्तस्वकीय मात्र खरेच हे सत्य आहे का? या यक्ष प्रश्नाचे उत्तर आजही कित्येकांना सापडलेले नाही.पण...जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले,तोची साधू ओळखावा देव तेथेची जाणावा.ही संत उक्ती ज्यांनी ज्यांनी आचरणात आणली ते आज धनाने किंवा घबाडाने गर्भश्रीमंत नाहीत तर मानवतेच्या शिखरावर विराजमान होऊन मानवरुपी कमावलेल्या धनाने निश्चितच श्रीमंत आहेत.त्यातलाच एक महत्त्वाचा दुवा ठरला आहे तो म्हणजे"युवा मराठा" सत्याच्या वाटेवरील एक पाऊल तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य सोबत घेऊन प्रत्यक्ष तसेच आचरणात आणणारा "युवा मराठा" सदैव दिनदुबळयांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहिला.संकटात अडचणीत सापडलेल्यांचा भरभक्कम आधार ठरला.मात्र क्षणिक स्वार्थासाठी कधी तडजोड केली नाही अथवा कधी कुठे हातमिळवणी केली नाही हीच खरे तर आमची जमेची बाजू आहे.सत्याच्या पाठीशी उभे राहून लढताना कधी हा विचार केला नाही की,समोर कोण उभा आहे फक्त आणि फक्त अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श विचारसरणी नुसार मिळत गेली म्हणूनच आजवर येथपर्यंतची लढाई संघर्षाच्या बळावर लढता आली."युवा मराठा"कधी कुणाच्या आईच्या रुपात उभा राहिला तर कधी बापाच्या रुपात पण समोरच्यांना हिंमत जिद्द आत्मविश्वास या त्रिसुत्री बहुगुणी मुलमंत्र देऊन घडवीत राहिला."युवा मराठा"ने सगळ्या जातीधर्मातील माय माऊल्या या आमच्या मातेसमान हे तत्व अंगिकारल्याने आज "युवा मराठा" महाराष्ट्राच्या नकाशावर झळकताना दिसतोय.जीव भावाची सगळ्याच जातीधर्माच्या अठरा पगड जाती व बारा बलुतेदार सहका-यांना सोबत घेऊन चालताना "युवा मराठा"ने कधीच आर्थिक अपेक्षा केल्या नाहीत किंवा कुठे तोडयापाण्या केल्या नाहीत हे सगळे लिहण्याचा उद्देश एवढाच की, प्रामाणिकपणे काम करीत असताना अनेक संकटे अडचणींना सामोरे जाऊन आज आम्ही तुमच्या समोर निधड्या छातीने खंबीरपणे उभे आहेत.तसे बघितले तर वृत्तपत्र सृष्टीशी आमची नाळ ही वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच जोडली गेली अनेक नामांकित वृत्तपत्रात काम केले.संपुर्ण महाराष्ट्रभर भटकंती केली.पण "युवा मराठा"चे रोपटे लावताना लहानपणाची साथीदार व सुख दुःखात सहभागी होणाऱ्या "युवा मराठा"च्या व्यवस्थापकीय संपादक यांना देखील विसरता येणार नाही.कारण आजचा "युवा मराठा "चा हा वटवृक्ष त्यांच्यामुळेच उभा राहिलेला आहे.आमच्या सोबत अनेक आलेत आणि गेलेत पण जे एकनिष्ठता बाळगून आजही आमच्या सोबतच आहेत त्यांच्याशी या जन्मी तरी आमच्या कडून प्रतारणा किंवा गद्दारी होणार नाही.मग ते प्रेम असो की, माणुसकी आम्ही आपल्या सगळयांच्या प्रेमावरच "युवा मराठा "जीवंत ठेवला आहे व राहील एव्हढेच यानिमित्ताने!

मुख्य संपादक
राजेंद्र राऊत पाटील
दैनिक युवा मराठा








# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्य सलग आठरा तास वाचन उपक्रम संपन्न.

देगलूर तालुका प्रतिनिधी, (गजानन अविनाश देसाई हसनाळकर व ग्रंथपाल पुंडलिक कदम, दीपक शिंदे) देगलूर :- अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व श्री समर्थ वाचनालय, देगलूर यांच्या संयुक्त विद्यमाने एम ओ यू अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी सलग 18 तास वाचन या उपक्रमाचे आयोजन देगलूर महाविद्यालयाच्या ग्रंथालयात करण्यात आले. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षतेस्थानी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सहसचिव श्री सुर्यकांत नारलावार होते. प्रमुख पाहुणे समर्थ वाचनाएलयाचे सचिव कोषाध्यक्ष देवेंद्र मोतेवार तसेच देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, डॉ. बालाजी कत्तुरवार, ग्रंथपाल, डॉ. साईनाथ शिंदे, सहायक ग्रंथपाल श्रीनिवास नाईक, समर्थ वाचनालयाचे संगमकर, बालाजी गोविंदवार, ईळेगावकर रेखा व महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून मतदानाची शपथ देण्यात आली. दिनांक 12/04/2024 रोजी सकाळी 05:00 पासून रात्री 11:00 वा. पर्यन्त विद्यार्थ्यांनी सलग 18 तास वाचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या उपक्रमात एकूण 53 विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.




# आदर्श शिक्षक संपतराव कासोद यांचे 93 व्या वर्षी निधन

जिल्हा प्रतिनीधी जालना-वसंतराव देशमुख दिनांक 13/04/2024 याविषयी सविस्तर माहिती अशी की,माहोरा येथील आदर्श शिक्षक माजी मुख्याध्यापक कै. संपतराव गोविंदराव कासोद यांचे दिनांक 12 एप्रिल रोजी सकाळी दहा वाजेच्या दरम्यान दुःखत निधन झाले. मृत्यू समई त्यांचे वय 93 वर्ष होते.शिक्षणाच्या बाबतीत अत्यंत कडक व शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख होती.तसेच शिस्तीच्या बाबतीत सुध्दा शिस्तप्रिय म्हणून जाफराबाद तालुक्यातून व माहोरा परिसरातून त्यांचा नावलौकिक आहे. त्यांच्या जाण्याने जाफराबाद तालुक्यातून तसेच माहोरा परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांना तीन मुले, दोन मुली ,सूना , नातवंड असा मोठा परिवार असून त्यांनी आपल्या मुलांना उच्च शिक्षित केले. दिलीप संपतराव कासोद वकील, रवींद्र संपतराव कासोद डॉक्टर, प्रदीप संपतराव कासोद डॉक्टर यांचे ते वडील होते. दुपारी चार वाजता त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री खा. रावसाहेब पाटील दानवे, आमदार संतोष पाटील दानवे, माजी आमदार चंद्रकांत पाटील दानवे, पत्रकार तथा अखिल भारतीय युवा मराठा महासंघाचे विभागीय उपाध्यक्ष श्री मुरलीधर डहाके यांच्यासह शैक्षणिक , वैद्यकीय, सामाजिक, सर्व राजकीय, पत्रकार, मित्र व नातेवाईक बाबांना अंत्यसंस्कार साठी व शेवटचा निरोप देण्यासाठी उपास्थित होते. बाबाच्या जाण्याने जाफराबाद व माहोरा परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.



# वादळी वाऱ्याने झाडे कोसळली अनेक मार्ग बंद, शाळेला सुट्टी.

अमरावती : पी एन देशमुख जिल्हा विभागीय संपादक. प्रतिनिधी. अमरावती. आज अमरावती शहरात शनिवारी पहाटे सकाळी चार वाजताच्या सुमारास शहरात वादळी वाऱ्यासह पाऊस आल्याने शहरातील अनेक भागात झाडे पुसून पडली. हीरोइन चौकातील भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रचार कार्यालय अक्षरशा जमीन दोस्त झाले. शहरातील बस स्थानकाकडून रेल्वे टेशन कडे जाणारा मार्ग बस स्थानकाकडून चौकात जाणारा मार्गावर विजेच्या तारा व झाडे कोसळली. खापर्डे बगीच्यातील राजवाडे विद्या भावनांच्या बदली बाजूने झाडे पडली शाळेच्या भिंती देखील झाड कोसळल्याने शाळेकडे जाणारे दोन्ही मार्ग बंद झाल्याने शाळेला सुट्टी देण्यात आली. शहरात अनेक भागात वीस पुरवठा खंडित झाला. विजेच्या तारा अक्षरशः जमिनीवर नोंद करत पडल्याचे दिसून आले.





Owned by Anshuraj Prakashan, the Newspaper is Owned, Printed and **Published by Shri. Rajendra Patil and R.R. Raut** Printed at 'Yuva Maratha' office, room no. 51/52, Maratha Bhavan, Maharaja Sayajirao Gaikwad Path, At. Po. Kaulane (N), Ta. Malegaon, Dist. Nashik (Maharashtra). Typographical errors are possible. Editors, Owners, Printers, Publishers do not necessarily agree with the news, articles and advertisements in this issue (any dispute under Malegaon Court). **Chief Editor Rajendra Patil Raut, Managing Editor Smt. Ashatai Bachhav,Co-Editor-Vijay Pawar, News Editor-Anshuraj Patil Raut** (Important Yuva Maratha News No. The claims made in the advertisement are settled by the advertiser If not, yuva Maratha newspaper management and printers, Publishers, editors, Owners will not be responsible for its consequences. Readers should kindly note this.)* **Legal Adviser - Adv. Prasad Sankpal (Mumbai High Cort) Reg. No. MAH-MAR-4172/2003, Head Office: B.D.D.No.17/18, Deliel Road, N.M.Joshi Marg, Loer Parel (Eest), Mumbai-13**